

**वडूज :** सीपी सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी गटशिक्षणाधिकारी सौ. विभुते, सौ. गायकवाड, अजित गुंड, विजय जगदाळे, मनीष शेठ, वैभव कुलकर्णी आणि संतोष शेलार.

# वडूज येथे नवीन सेरेब्रल पाल्सी सेंटरचे उद्घाटन

**फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनचा उपक्रम**

**वडूज, दि. २० (प्रतिनिधी)** - फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दहा वर्षांपासून सातारा जिल्ह्यात सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी वैद्यकीय व सामाजिक सेवा प्रदान केली जात आहे. याच उपक्रमाचा पुढचा टप्पा म्हणून खटाव व माण तालुक्यांतील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी वडूज येथील जिल्हा परिषद शाळा क्र. १ येथे नवीन सीपी सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

वडूज येथे हे केंद्र सुरू झाल्यामुळे खटाव व माण तालुक्यांतील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांचे पालक अत्यंत आनंदित झाले आहेत. ही सेवा आमच्यासाठी मोठा आधार ठरेल, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या.

या कार्यक्रमास खटाव तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सौ. विभुते, शिक्षण विस्तार अधिकारी सौ. गायकवाड, सर्व शिक्षा अभियानाचे तालुका समन्वयक अजित गुंड, राऊत व सौ. राऊत, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे वितरक विजय जगदाळे, मनीषशेठ, अग्रवाल, अभिषेक चौगुले, वैभव कुलकर्णी, मुकुल माधव फाउंडेशनचे संतोष शेलार यांची उपस्थिती लाभली. कृष्णा हॉस्पिटलच्या डॉ. नम्रता कदम आणि त्यांच्या फिजिओथेरपी टीमने देखील सहभाग घेतला.

या आजाराच्या समूळ निर्मूलनासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे, असा विश्वास फाउंडेशनच्या विश्वस्त सौ. रितू छाब्रिया यांनी व्यक्त केला. या दृष्टिकोनातून सर्व शिक्षा अभियानाच्या सहकार्याने अर्ली इंटरव्हेन्शन उपक्रम राबवण्यात येत आहे. आशा आणि अंगणवाडी सेविकांना यासंदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे.